# कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०१९

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८.१.२०१९ व दिनांक ४.७.२०१९ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार जिल्हा पोलीस दलातील **पोलीस अधीक्षक,कोल्हापूर** यांच्या आस्थापनेवरील जिल्हा पोलीस शिपाई / जिल्हा पोलीस बॅन्डस्मन, यांची रिक्त असलेली ७८ (नमुद पदापैकी बॅन्डसमन पदे-०३) पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapariksha.gov.in, www.kolhapurpolice.gov.in आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास (१) कोल्हापूर जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील जिल्हा पोलीस शिपाई, (२) कोल्हापूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील जिल्हा पोलीस बॅन्डस्मन अशा विविध पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. प्रत्येक पदाच्या अर्जासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारण्यात येईल. जिल्हा पोलीस शिपाई, जिल्हा पोलीस बॅन्डस्मन पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे.
- जिल्हा पोलीस शिपाई या पदांच्या आवेदन अर्जांसाठी उमेदवाराची एकच लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रथम घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जिल्हा पोलीस बॅन्डस्मन पदांच्या आवेदन अर्जांसाठी उमेदवारांची एकच लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रथम घेण्यात येणार आहे. शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे शारिरीक मोजमाप व शारिरीक चाचणी उमेदवाराने अर्ज भरलेल्या पोलीस घटकांमार्फत घेण्यात येईल. दोन घटकांतील शारीरिक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही. एकाच पोलीस घटकातील एकाच पदासाठी दोन अर्ज करण्यास मुभा नाही. असे आढळल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम लेखी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. त्यानंतर गुणत्तेनुसार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीत प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.
- शासनाने लागू केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागू केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची एकूण संख्या / पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.
- जिल्हा पोलीस शिपाई / जिल्हा पोलीस बॅन्डस्मन पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात काळजीपूर्वक वाचून, समजून घेऊन व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**

31/08/19

**(डॉ.अभिनव देशमुख)**
**पोलीस अधीक्षक,कोल्हापूर**

# कोल्हापूर जिल्हा पोलीस दल

## पोलीस शिपाई भरती २०१९ जाहिरात कप्पीकृत आरक्षण

| | खुला | अजा १३ % | अज ७ % | विज-अ ३% | भज-ब २.५% | भज-क ३.५ % | भज-ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | एसईबीसी १३ % | इडब्लल्यु १० % | एकुण १०० % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ० | ३ | ३३ | ० | १२ | ० | ० | १५ | १५ | ० | ० | ७८ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | २ | ८ | | २ | | | ५ | ५ | | | २२ |
| महिला ३० % | ० | १ | १० | ० | ४ | ० | ० | ४ | ४ | ० | ० | २३ |
| खेळाडु ५ % | ० | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ५ |
| प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ५ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| माजी सैनिक १५% | ० | ० | ५ | ० | २ | ० | ० | २ | २ | ० | ० | ११ |
| अंशकालीन पदवीधर ५% | ० | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ५ |
| पोलीस पाल्य ३% | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| गृह रक्षक दल ५% | ० | ० | २ | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ५ |
| अनाथ १% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | ० | ३ | ३३ | ० | १२ | ० | ० | १५ | १५ | ० | ० | ७८ |

टिप-वर नमूद पदापैकी बँन्डसमनच्या पदांची संख्या ०३ एवढी आहे.

३१/०८/१९

(डॉ.अभिनव देशमुख)
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर